Vidyabharati International Interdisciplinary Research Journal 3(2) 123-125 ISSN 2319-4979

# राष्ट्रीय कृषी विमा योजना एक आढावा

वि. तिडके
वाणिज्य विभाग, आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळ

## सारांश

*भारतात सन 1985 पासून केंद्र पुरस्कृत सर्वकष पीक विमा योजना, भारतीय साधारण विमा निगमच्या (जी.आय.सी.) सहकार्याने राबविली जाते. ही योजना अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने इतर निरनिराळया योजना रद्द करून एकच राष्ट्रीय पीक विमा योजना या नावाची नवीन योजना देशात राबविण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार व राष्ट्रीय पीक विमा कंपनीच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्यात 1999 पासून राबविण्यात सुरूवात झाली. महाराष्ट्रात 23,175 हजार हेक्टर मध्ये पिके घेतली जातात. यात प्रामुख्याने तांदूळ, ज्वारी, बाजरी, तृणधान्ये, कडधान्ये,ऊस, कापूस, भुईमुंग इत्यादींचा समावेश होतो. कापूस हे राज्यातील प्रमुख पिक आहे. देशाच्या कापूस उत्पादनात राज्याचा वाटा 34.1 टक्के आहे. राज्यात तेलबीयांच्या क्षेत्रात वाढ होत आहे. राज्यातील शेतींचा प्रकार व हवामानाप्रमाणे शेतकरी पिकांची निवड करून पिके घेतात. सिंचनाची व्यवस्था अत्यल्प उपलब्ध आहे. अनेकदा हवामानातील बदलामुळे पिके नष्ट होतात. अतीवृष्टी, अल्पवृष्टी, गारपीट, निसर्गाचा लहरीपणा व रोगराईमुळे पिके नष्ट होतात. दुष्काळी परिस्थिती निर्माण होते, शेतकरी संकटात सापडतो. अशावेळी त्याला आधार व मदत करण्यासाठी शासनाशिवाय कोणी वाली नसतो. शासनालाही शेतकऱ्यांना आर्थिक मदत करतांना मर्यादा पडतात. तेव्हा पीक विमा योजना हा एकमेव पर्याय शासन व शेतकऱ्यांकडे उपलब्ध असतो. या करिता शासनाची मदत व सहकार्याची आवश्यकता भासते. याच दृष्टीकोनातून पीक विमा योजनेचा आढावा घेणे हा शोध निबंधाचा उद्देश आहे.*

## प्रास्ताविक

शेतकऱ्याला जगाचा अन्नदाता म्हणून संबोधले जाते. जगातील संपूर्ण लोकसंख्या अन्नधान्याच्या बाबतीत शेती व्यवसायावरच अवलंबुन आहे. स्वातंत्र्याच्या नजिकच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन कृषीप्रधान देश म्हणून केले जात होते. कारण त्यावेळी भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील जवळजवळ 50 टक्के उत्पन्न कृषी क्षेत्रातून मिळत होते आणि जवळजवळ 76 टक्के लोकसंख्या रोजगाराच्या बाबतीत कृषी व्यवसायावर अवलंबुन होती. आजसुध्दा 2014 च्या आकडेवारीनुसार भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा हिस्सा जवळजवळ 14 टक्के व रोजगाराच्या बाबतीत जवळजवळ 50 टक्के रोजगार कृषी व्यवसायातून निर्माण केला जातो. यावरून भारताला कृषीप्रधान देश म्हटले तर अतिशोक्ती ठरणार नाही.

कृषी व्यवसाय निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबुन आहे. जागतिक हवामान बदलामुळे अतिवृष्टी, पावसातील खंड, कीड व रोगांचा प्रादुर्भाव, थंडीची लाट, तापमान वाढ, अशाप्रकारच्या आपत्तींना शेतकऱ्यांना व शेतीला सामोरे जावे लागत आहे. अशाप्रकारच्या आपत्तीपासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्याच्या हेतूने प्रभावी उपाय योजनांचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यात शेती पिकाकरिता राष्ट्रीय कृषी विमा योजना राबविण्यात येते.

पिक विमा योजनेची मूळ संकल्पना डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी 1947 मध्ये मांडली होती. त्यानंतर वि.म. शंदेकर समितीने पथदर्शक विमा योजना तयार केली. भारतात पिक विम्याची सुरूवात सर्वप्रथम 1985 साली झाली. त्यावेळेस तीचे स्वरूप 'सर्वसमावेशक पिक विमा योजना' असे होते. त्यानंतर 1999 च्या रब्बी हंगामापासून म्हणजे आक्टो. 1999 पासून पिक विमा योजना लागू केली. ही योजना राबविण्यामध्ये भारत सरकार, राज्य सरकार, भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ व अग्रणी बॅंका ही योजना राबवित आहे.

## राष्ट्रीय कृषी विमा योजना, स्वरूप

सर्वकष पीक विमा योजनेची पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्या पुरते मर्यादित स्वरूप बदलुन कर्जदार तसेच बिगर कर्जदार अश सर्वच शेतकऱ्यांना सहभागी करून घेणारी राष्ट्रीय कृषी विमा योजना ही सुधारीत स्वरूपात इ.स. 1999–2000 च्या रब्बी हंगामापासून राज्यात राबविण्यात येत आहे. यामध्ये विमा संरक्षण रकमेवरील मर्यादा (रू.10,000) रद्द करून पेरणी केलेल्या संपूर्ण क्षेत्राला विमा संरक्षण देण्याची तरतूद या योजनेत करून देण्यात आली आहे.

राष्ट्रीय कृषी विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सन 1999–2000 रब्बी ते 2006–07 खरीप हंगाम पर्यंत रूपये 924 कोटींचे नुकसानभरपाई अदा करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय कृषी विमा योजनेचे उद्देश

1. दुष्काळ, पुर, यासारख्या नैसर्गीक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानाची शेतकऱ्यांना भरपाई करून देणे.
2. किड व रोगराईचा प्रार्दुभाव झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे.
3. शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये प्रगत तंत्रज्ञान तसेच योग्य त्या निविष्ठा वापरण्यास प्रोत्साहीत करणे.
4. आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी मदत करणे.

## राष्ट्रीय कृषी विमा योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांची पात्रता

1. योजनेमध्ये कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना भाग घेता येतो.
2. राष्ट्रीय कृषी विमा योजना शेतकऱ्यांकरिता खातेदाराच्या व्यतिरिक्त कुळांसाठी सुध्दा ही योजना सुरू करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय कृषी विमा योजनेत समाविष्ट पिके

राष्ट्रीय कृषी विमा योजनेत खालील पिकांचा समावेश केलेला आहे.

1. तृणधान्य – भात खरीप व रब्बी, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका, गहू इत्यादी तृण धान्याचा समावेश केलेला आहे.
2. कडधान्य– तुर, उडीद, मुग, हरबरा इ. कडधान्याचा समावेश या योजनेत केलेला आहे.
3. गळीत धान्य– भुईमुग, सोयाबीन, करडई, सुर्यफुल, तीळ, कारले इत्यादी गळीत धान्याचा समावेश या योजनेत केलेला आहे.
4. व्यापारी पिके – ऊस, कापुस, कांदा इत्यादी व्यापारी पिकांचा समावेश या योजनेमध्ये करण्यात आला आहे.

## राष्ट्रीय कृषी विमा योजनेची वैशिष्टये

नवीन राष्ट्रीय कृषी विमा योजनेची खास वैशिष्टये खालील प्रमाणे आहेत –

1. नविन पिकांचा समावेश करून योजनेच्या व्याप्तीत वाढ केलेली आहे. ऊस, मुग, उडीद, कापूस, मका व कांदा इत्यादी पिकांचा समावेश नव्याने करण्यात आला आहे.
2. विमा संरक्षीत रकमेवरील मर्यादा काढून टाकलेली आहे.
3. विमा संरक्षीत रकमेची व्याप्ती वाढवून त्यांची सांगड सरासरी उत्पन्न व किमान आधारभुत किंमतीशी घालण्यात आली आहे. त्यामुळे प्रती हेक्टरी पीक कर्जदाराचे विमा संरक्षीत रकमेवरील बंधन आपोआप नाहीसे होते.
4. शेतकऱ्यांना सर्वसाधारण जादा पीक संरक्षीत रक्कम (सरासरी) उत्पन्नाच्या 150 टक्के पर्यंत विमा उपलब्ध करण्यात आला आहे.
5. अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी पीक विमा हप्ता रकमेत 10 टक्के अनुदान आहे.

पीक विमा योजनेतील हंगामनिहाय शेतकऱ्यांचा सहभाग दर्शविणारा तक्ता

| वर्ष | खरीप हंगाम (लाखात) | रब्बी हंगाम (लाखात) | एकूण (लाखात) |
|---|---|---|---|
| 2001–02 | 26.06 | 0.85 | 26.91 |
| 2002–03 | 17.93 | 2.48 | 20.41 |
| 2003–04 | 17.27 | 10.35 | 27.62 |
| 2004–05 | 21.65 | 1.41 | 23.06 |
| 2006–07 | 16.38 | 0.38 | 16.76 |
| 2007–08 | 18.91 | 0.92 | 19.83 |
| 2008–09 | 34.50 | 0.52 | 35.02 |
| 2009–10 | 31.01 | 0.82 | 31.83 |
| 2010–11 | 21.48 | 0.56 | 22.04 |
| 2011–12 | 21.91 | 2.20 | 25.11 |
| 2012–13 | 13.30 | 9.21 | 22.51 |
| 2013–14 | 15.60 | 2.57 | 18.17 |

सुधारीत राष्ट्रीय कृषी विमा योजना रब्बी 1999–2000 हंगामापासून महाराष्ट्र राज्यात शेती पीकाकरिता राबविण्यात येत आहे. राज्यात सुमारे 1. 36 कोटी शेतकरी कुटुंब आहेत. खरीप हंगामात सर्वात जास्त सहभाग 2008–09 मध्ये 34.50 लाख तर रब्बी हंगामात 2012–13 मध्ये 9.21 लाख होता तो एकूण शेतकऱ्यांच्या तुलनेत अतीशय कमी आहे. शेतकऱ्यांनी आर्थिक स्थैर्य मिळविण्यासाठी व शेती व्यवसायातील धोक्यांची तीव्रता कमी करण्यासाठी पीक विमा योजनेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी होणे आवश्यक आहे.

## कृषी विमा योजनेचे फायदे

कृषी क्षेत्रातील अनिश्चिततेचे प्रमाण कमी करण्यासाठी कृषी पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. हया योजनेमुळे शेतकऱ्यांना होणारे फायदे पुढीलप्रमाणे आहेत.

1. नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाले तरी कृषी विमा काढलेला असल्यास शेतकऱ्यास विपन्नावस्थेत (संकटास) तोंड द्यावे लागत नाही.
2. ज्यावर्षी पिक चांगले येते त्यावर्षीची विमा हप्त्याची जमा होणारी रक्कम पुढे वाईट (संकटकालीन) वर्षामध्ये शेतकऱ्यांनाच मदत देण्यासाठी वापरणे शक्य होते.
3. विमा संरक्षणामुळे शेतकरी शेतीत विविध प्रयोग करून सुधारणा आणू शकतो.
4. अतीवृष्टी, आवर्षण इत्यादी नैसर्गिक संकटामुळे एखादे वर्षी पिक बुडाले तरी विमा संरक्षणामुळे शेतकऱ्यास दुसऱ्या हंगामासाठी सहज कर्ज उपलब्ध होते.
5. विमा संरक्षण या योजनेत सहभागी झाल्यास नवीन व खर्चीक तंत्रज्ञानाचा वापर करणे शक्य होते.
6. अन्नधान्य, तेलबीया, ऊस, कापुस यासारख्या कृषी उत्पादनाला कृषी पिक विम्यामुळे आधार आणि प्रोत्साहन मिळते.

## निष्कर्ष

राष्ट्रीय कृषी विमा योजना ही शेतकऱ्यांना आर्थिक स्थिरता मिळावी यासाठी सुरू करण्यात आलेली एक स्तुत्य उपक्रम आहे. परंतु हया योजनेची यशस्वीता ही शेतकऱ्यांच्या सहभागावर अवलंबुन आहे आणि सध्याच्या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, हया योजनेचा लाभ अजुनही खुप कमी शेतकरी घेत आहे. भविष्यात शेतकऱ्यांनी हया योजनेत मोठया प्रमाणावर सहभागी व्हावे. तेव्हाच शेतकऱ्यांना व शेती व्यवसायाला अस्तीरतेकडून स्थिरतेकडे जाता येईल. केंद्र तथा राज्य शासनानी कृषी विमा योजनेकडे गांभीर्याने दाद देऊन जास्तीत जास्त शेतकऱ्याचा सहभाग वाढविण्याकरिता प्रयत्नांची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथ


1. भारतीय अर्थव्यवस्था वार्षिकांक (2011), प्रतियोगिता साहित्य प्रकाशन.
2. भारतीय अर्थव्यवस्था – दत्त आणि सुंदरम्
3. योजना मासिक